# फुटबॉलच्या माध्यमातून तयार होतेय आंतरराष्ट्रीय खेळाडू : महापौर नंदा जिचकार



फुटबॉल सामन्यांचे थाटात उद्घाटन : मनपा-आई फाऊंडेशनचे आयोजन

फुटबॉल हा सर्व खेळांचा राजा आहे. १३ वर्षापूर्वी आई फाऊंडेशनने 'झोपडपट्टी फुटबॉल स्पर्धे'च्या रूपात लावलेल्या रोपट्याचे आज वटवृक्षात रूपांतर झाले आहे. या स्पर्धेच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय खेळाडू तयार होत असल्याचे गौरवोद्गार महापौर नंदा जिचकार यांनी काढले.

नागपूर महानगरपालिका आणि आई कुसूम सहारे फाऊंडेशनच्या संयुक्त विद्यमाने स्थानिक रेशीमबाग मैदानावर आयोजित फुटबॉल सामन्याच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी विरोधी पक्ष नेते तानाजी वनवे, बसपाचे मनपातील पक्षनेते मोहम्मद जमाल, क्रीडा सभापती व आई फाऊंडेशनचे अध्यक्ष नागेश सहारे, क्रीडा समिती उपसभापती प्रमोद तभाने, हनुमाननगर झोन सभापती भगवान मेंढे, नेहरूनगर झोन सभापती रेखा साकोरे, सतरंजीपुरा झोन सभापती संजय चावरे, माजी उपमहापौर नगरसेवक सतीश होले, नगरसेविका उषा पायलट, शीतल कामडे, नेहा वाघमारे, विरंका भिवगडे, स्नेहल बिहारे, मधुसूदन मुळे, शरद गोंडाणे, महाराष्ट्र ॲथलेटिक्स संघटनेचे सचिव शरद सूर्यवंशी प्रामुख्याने उपस्थित होते.

प्रारंभी महापौर नंदा जिचकार यांनी फीत कापून आणि फुटबॉलला 'कीक' मारून स्पर्धेचे उद्घाटन केले. त्यानंतर महापौर नंदा जिचकार व सर्व प्रमुख पाहुण्यांनी खेळाडूंची ओळख करून देत गुलाबपुष्प देऊन त्यांचे स्वागत केले.

प्रास्ताविकात क्रीडा सभापती नागेश सहारे यांनी फुटबॉल स्पर्धेमागची पार्श्वभूमी सांगितली. आई फाऊंडेशन मागील अनेक वर्षापासून क्रीडा संस्कृती रुजवत आहे. यावर्षी महानगरपालिकेने या कार्याला बळ दिले आहे. संपूर्ण नागपुरात क्रीडाविषयक वातावरण निर्मिती करण्याचा प्रयत्न करीत असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी विरोधी पक्ष नेते तानाजी वनवे, बसपाचे पक्ष नेते मोहम्मद जमाल आणि महाराष्ट्र ॲथलेटिक्स संघटनेचे सचिव शरद सूर्यवंशी यांनी स्पर्धेला आणि खेळाडूंना आपल्या मार्गदर्शनातून शुभेच्छा दिल्या. तत्पूर्वी महापौर व अन्य मान्यवरांनी वृक्षारोपण केले.

संचालन मनपाचे क्रीडा निरीक्षक नरेश चौधरी यांनी केले. आभार क्रीडा समितीचे उपसभापती प्रमोद तभाने यांनी मानले. स्पर्धेचे संपूर्ण नियोजन आई फाऊंडेशनचे ॲडविन ॲन्थोनी आणि त्यांचे सहकारी सांभाळीत आहेत.

पहिल्या सामन्यात नवरंग क्रीडा मंडळ विजयी उद्घाटनपर पहिला सामना लकी स्टार मोमीनपुरा आणि नवरंग क्रीडा मंडळ, अजनी यांच्यात रंगला. हा सामना नवरंग क्रीडा मंडळाने ०-१ ने खिशात घातला. नवरंग क्रीडा मंडळाचा खेळाडू विनू पॉल याने ५२ व्या मिनिटाला गोल करीत सामना वळविला.

बुधवारी चार सामने स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी बुधवारी (ता. २) चार सामने होतील. पहिला सामना एटू एजीडब्ल्यू बालाजीनगर विरुद्ध टाईम फॅसिलिटी चंद्रमणीनगर, दुसरा सामना दीप वारिअर्स अजनी विरुद्ध युनीटी क्लब मोतीबाग, तिसरा सामना एचएफटी हनुमाननगर विरुद्ध सोनझारी वारिअर्स बिडीपेठ तर चौथा सामना जुलिएट इलेव्हन कौशल्यानगर विरुद्ध गोंड बॉईज नवीन बस्ती सदर यांच्यामध्ये होईल.

# शहरातील स्वच्छतेला प्राधान्य द्या : महापौर नंदा जिचकार

शहर स्वच्छ ठेवणे हे प्रत्येकाचे कर्तव्यच आहे त्या दष्टीने त्वरित उपाययोजना करा. शहरातील स्वच्छतेला प्राधान्य द्या, असे निर्देश महापौर नंदा जिचकार यांनी प्रशासनाला दिले.

नागपूर महानगरपालिकेद्वारे शहरातील नागरिकांकरिता सुलभ शौचालयांची स्वच्छता, देखभाल करण्यासाठी नेमण्यात आलेल्या एजंसीमार्फत करण्यात आलेल्या कार्यवाही व त्यावर येणारा खर्च यासंबंधीचा आढावा मंगळवारी (ता. २) महापौरांनी घेतला. यावेळी उपमहापौर दीपराज पार्डीकर, आयुक्त अश्विन मुदगल, माजी महापौर प्रवीण दटके, ज्येष्ठ नगरसेवक दयाशंकर तिवारी, अतिरिक्त आयुक्त रवींद्र कुंभारे, अतिरिक्त उपायुक्त जयंत दांडेगावकर, मुख्य अभियंता विजय बनगीरवार, अधीक्षक अभियंता दीपक सोनटक्के, कार्यकारी अभियंता (स्लम) डी.डी. जांभूळकर, आरोग्य अधिकारी डॉ. प्रदीप दासरवार प्रामुख्याने उपस्थित होते. नागपूर शहरात ६३ ठिकाणी सुलभ शौचालये असून विविध एजंसीजला त्याच्या देखभाल दुरुस्तीचे काम देण्यात आले आहे. सद्यस्थितीत १३ महिला प्रसाधन गृहे व ३७ पुरुष प्रसाधन गृहांचे कामे सुरू असून ते लवकरात लवकर पूर्ण होणार असल्याची माहिती कार्यकारी अभियंता डी.डी. जांभूळकर यांनी दिली.

महापौर नंदा जिचकार यांनी ठिकठिकाणी महिला स्वच्छतागृहे उभारण्यास प्राधान्य द्या. बाजार भागात ते असायलाच हवे, याची काळजी घ्या. जेथे स्वच्छतागृहे उभारण्यासाठी जागेची अडचण येत आहे तेथे स्थानिक नगरसेवकांची मदत घेण्यात यावी, असे आदेश दिले. निर्माणाधीन असलेली नवीन शौचालये अद्ययावत असावीत याकडेही अधिकाऱ्यांनी लक्ष द्यावे, असेही त्या म्हणाल्या. या कामात स्वयंसेवी संस्थांची मदत घेण्याबाबतही त्यांनी अधिकाऱ्यांना सुचविले. स्वच्छता ॲप डाऊनलोड करण्यावर भर देण्यात यावा, अशा सूचनाही त्यांनी केल्या.

बैठकीला झोन सहायक आयुक्त महेश मोरोणे, राजेश कराडे, राजु भिवगडे, अशोक पाटील, प्रकाश वराडे, विजय हुमने, सुभाष जयदेव, हरिश राऊत, कार्यकारी अभियंता डी.डी. जांभूळकर, संजय जैस्वाल, मोती कुकरेजा, सी.जी. धकाते, अनिरूद्ध चौगंजकर, कांतीकुमार सोनकुसरे, राजेश भूतकर, स्थावर अधिकारी आर.एस. भुते उपस्थित होते.

# कविवर्य सुरेश भट सभागृहामुळे नागपूरच्या सांस्कृतिक वैभवात भर : महापौर



**महापौर, आयुक्त, स्थायी समिती सभापतींनी केली सुरेश भट सभागृहाची पाहणी**

नागपुरातील अद्ययावत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून, पूर्णपणे सौर ऊर्जेवर संचालित कविवर्य सुरेश भट सभागृहाचे कार्य अंतिम टप्प्यात आहे. येत्या काही दिवसांत उद्घाटन होणार असलेल्या या सभागृहाच्या अंतिम टप्प्यातील कामांची पाहणी महापौर नंदा जिचकार, उपमहापौर दीपराज पार्डीकर, स्थायी समिती सभापती संदीप जाधव आणि आयुक्त अश्विन मुदगल यांनी पदाधिकारी व अधिकाऱ्यांसह संयुक्तपणे केली.

यावेळी माजी महापौर तथा ज्येष्ठ नगरसेवक प्रवीण दटके, ज्येष्ठ नगरसेवक दयाशंकर तिवारी, शिक्षण सभापती प्रा. दिलीप दिवे, मनपाचे मुख्य अभियंता विजय बनगीरवार, कार्यकारी अभियंता (विद्युत) संजय जैस्वाल, अधीक्षक अभियंता मनोज तालेवार, उपअभियंता गभने, जनसंपर्क अधिकारी अशोक कोल्हटकर आदी उपस्थित होते.

कविवर्य सुरेश भट सभागृह हे महाराष्ट्रातील सर्वाधिक प्रेक्षक क्षमता असलेले सभागृह आहे. दोन हजार आसनक्षमता, २०० चार चाकी वाहनांची पार्किंग, सौर ऊर्जेवर संचालित अद्ययावत प्रकाश व्यवस्था, अत्याधुनिक ध्वनिव्यवस्था हे या सभागृहाचे मुख्य आकर्षण आहे. सभागृहाचे काम अंतिम टप्प्यात असून अखेरचा हात सभागृहावर फिरविला जात आहे.

याप्रसंगी बोलताना महापौर नंदा जिचकार म्हणाल्या, कविवर्य सुरेश भट सभागृह हे नागपूरची नवी ओळख निर्माण करणारे ठरेल. मध्य भारतातील अत्याधुनिक सांस्कृतिक सभागृह म्हणून ते नावारूपास येईल, यात शंका नाही. यामुळे नागपूरच्या सांस्कृतिक वैभवात भर पडणार असल्याचेही त्या म्हणाल्या. सभागृहाचे संपूर्ण काम आटोपल्यानंतर पुढील काही दिवसातच सभागृहाचे लोकार्पण करण्यात येईल, अशी माहितीही यावेळी महापौर नंदा जिचकार यांनी दिली.

आयुक्त अश्विन मुदगल यांनी यावेळी कंत्राटदाराला काही सूचना केल्यात. अगदी बारिक-सारिक बाबींकडे कंत्राटदाराने लक्ष द्यावे. शिल्लक कार्य तातडीने पूर्ण करावे, अशा सूचना त्यांनी केल्या. यावेळी महापौर, आयुक्त आणि अन्य पदाधिकाऱ्यांनी सभागृहाची आसनव्यवस्था, प्रकाश व्यवस्था, दिव्यांगासाठी सभागृहात प्रवेश करण्यासाठी असलेली विशेष व्यवस्था, एक हजार, दीड हजार आणि दोन हजार आसन क्षमता कार्यक्रमानुसार करता येईल, अशी व्यवस्था,

वाहनतळ व्यवस्था, व्हीआयपी पार्किंग व्यवस्था, सभागृहाच्या प्रवेशद्वारानंतरच्या सभागृहात लावलेला २४ फूट व्यासाचा अत्याधुनिक पंखा, स्वच्छतागृहे, ॲम्पी थिएटर आदींची माहिती घेतली. आंतरसज्जेचे काम करणारे सुपर कंस्ट्रक्शनचे सुरेश पटेल व सभागृहाच्या कामावर देखरेख ठेवणारे अधिकारी, कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

# सेंट्रल एव्हेन्यू रोड मार्गे *बर्डी ते दिघोरी 'आपली बस' सेवेला सुरुवात



**नागरिकांनी मानले परिवहन सभापतींचे आभार**

सेंट्रल एव्हेन्यू रोड परिसरातील नागरिकांना कामानिमित्त नियमित दिघोरीपर्यंत जावे लागते. मात्र आपली बस सेवा उपलब्ध नसल्याने नागरिकांची गैरसोय होत होती. नागरिकांची ही गरज लक्षात घेता नागरिकांच्या मागणीवर तातडीने निर्णय घेण्याचे आश्वासन परिवहन सभापती जितेंद्र (बंटी) कुकडे यांनी दिले होते. आपले आश्वासन पूर्ण करत आमदार कृष्णा खोपडे यांच्या हस्ते आणि परिवहन सभापती बंटी कुकडे यांच्या उपस्थितीत रविवारी (ता. ६ ऑगस्ट) सेंट्रल एव्हेन्यू रोड मार्गे बर्डी ते दिघोरी बस सेवेला प्रजापती चौक येथे हिरवी झेंडी दाखविली. यावेळी प्रामुख्याने नगरसेविका मनिषा धावडे, नंदराज सोनी, प्रशांत रतन, महेंद्र कटारिया, मनोज अग्रवाल, विनोद कोचर, अशोक सावरकर, कमलेश नागपाल, श्याम बजाज, सुनील डहाके, आशिष धावडे यांच्यासह परिसरातील नागरिकांची उपस्थिती होती.

सेंट्रल एव्हेन्यू मार्गे जाणारी 'आपली बस' बर्डी ते दिघोरी गांधीबाग, प्रजापती चौक, डे-टु-डे चौक,खरबी चौक मार्गाने जाईल. बर्डी येथून पहिली बस सकाळी ५.४५ वाजता सुटेल तर शेवटची बस रात्री ९.४० ला राहील. तसेच दिघोरी वरुन पहिली बस सकाळी ६.३० वाजता राहणार असून शेवटची बस रात्री ९.५५ वाजता सुटेल. या मार्गावर बसच्या दररोज जाणे आणि येणे ३०-३० फे-या असणार आहे. नागरिकांची गैरसोय लक्षात घेता तातडीने बस सेवा सुरू करुन नागरिकांच्या गरजेच्या वेळेनुसार वेळापत्रक तयार केल्याबद्दल नागरिकांनी परिवहन सभापती जितेंद्र (बंटी) कुकडे यांचे आभार मानले. नागरिकांना दर्जेदार वाहतूक सेवा देण्यासाठी आपण कटिबद्ध असून नागरिकांनी 'आपली बस' संबंधित काही समस्या असल्यास संपर्क साधावा आणि 'आपली बस'चा वापर करावा, असे आवाहनही यावेळी सभापतींनी केले.

# अवैधरीत्या नळ कनेक्शन जोडणाऱ्या ग्राहकांवर होणार गुन्हे दाखल



**चल संपत्ती, मालमत्तांची होणार जप्ती - अभय योजनेअंतर्गत कार्य न करणाऱ्या कर्मचाऱ्यांवरही कारवाईचा बडगा**

सवलतीची योजना जाहीर करूनही कर भरण्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या थकबाकीदारांच्या चल मालमत्तेवर टाच येणार आहे. ११ ऑगस्टपासून कार, मोटारसायकल, टीव्ही, फ्रीज, सोफा आदी चल संपत्ती आणि त्यानंतर कायद्यानुसार अचल संपत्ती जप्त करण्याचे आदेश महापौर नंदा जिचकार आणि आयुक्त अश्विन मुदगल यांनी दिले. इतकेच नव्हे तर नळ कनेक्शन कापलेल्या थकबाकीदारांनी पुन्हा ते जोडले असेल अशा थकबाकीदारांवर पुढील तीन दिवसांत गुन्हे नोंदविण्यात यावे, असे आदेशही त्यांनी झोनल अधिकारी आणि ओसीडब्ल्यू अधिकाऱ्यांना दिले.

थकीत मालमत्ता कर आणि पाणी कर असणाऱ्या ग्राहकांसाठी नागपूर महानगरपालिकेने १७ जुलै ते १० ऑगस्ट या काळात 'अभय योजना' जाहीर केली आहे. प्रारंभी या योजनेचा कालावधी ७ ऑगस्टपर्यंत होता. यानंतर योजनेला तीन दिवसाची मुदतवाढ देण्यात आली. दरम्यान योजनेतील कालावधीत झोननिहाय वसुलीचे उद्दिष्ट काय होते, किती टक्के वसुली करण्यात आली, कमी वसुलीची कारणे काय आणि कुठल्या कर्मचाऱ्यांनी योजनाकाळात कर्तव्यात हलगर्जीपणा केला, यासंदर्भात मनपाच्या छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय इमारतीतील सभागृहात आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीला महापौर नंदा जिचकार, सभापती संदीप जाधव, सत्तापक्ष नेते संदीप जोशी, आयुक्त अश्विन मुदगल, माजी महापौर तथा ज्येष्ठ नगरसेवक प्रवीण दटके, ज्येष्ठ नगरसेवक दयाशंकर तिवारी, नगरसेविका दिव्या धुरडे, अतिरिक्त आयुक्त रवींद्र कुंभारे, अतिरिक्त आयुक्त डॉ. रिजवान सिद्दीकी, उपायुक्त रवींद्र देवतळे, कार्यकारी अभियंता (जलप्रदाय) संजय गायकवाड, सहायक आयुक्त (कर) मिलिंद मेश्राम, ओसीडब्ल्यूचे राहुल कुळकर्णी उपस्थित होते. सदर बैठकीत महापौर नंदा जिचकार आणि आयुक्त अश्विन मुदगल यांनी अभय योजनेअंतर्गत मागील २० दिवसांत करण्यात आलेल्या करवसुलीचा झोननिहाय आढावा घेतला. ज्या थकबाकीदारांनी योजनेत सहभागी न होता अजूनही थकबाकी ठेवली आहे अशा थकबाकीदारांवर सर्व प्रकारची कायदेशीर कार्यवाही करण्याचे निर्देश महापौर आणि आयुक्तांनी दिले. अभय योजनेदरम्यान कर्तव्यात कुचराई करणाऱ्या कर निरीक्षक व संबंधित कर्मचाऱ्यांची यादी तातडीने सर्व सहायक आयुक्तांनी आयुक्तांकडे सोपवावी. त्यांना तातडीने कारणे दाखवा नोटीस देऊन त्यांच्यावर निलंबनाची आणि

वेतनवाढ थांबविण्याची कार्यवाही करण्याचे आदेश महापौर नंदा जिचकार यांनी दिले.

बैठकीला सर्व झोनचे सहायक आयुक्त सर्वश्री महेश मोरोणे, आर. पी. भिवगडे, जी. एम. राठोड, राजेश कराडे, अशोक पाटील, पी. एल. वऱ्हाडे, सुभाष जयदेव, विजय हुमने, हरिश राऊत, झोनचे जलप्रदायचे डेलिगेट उपस्थित होते.

**धनादेश अनादरप्रकरणीही होणार कारवाई**

मालमत्ता योजनेअंतर्गत कर रक्कम चुकविण्यासाठी दिलेल्या धनादेशापैकी ज्या ग्राहकांचे धनादेश अनादरित झाले त्यांच्यावरही नियमानुसार कारवाई करण्यात येणार आहे.

**अवैधरीत्या नळ कनेक्शन जोडणाऱ्यांवर होणार गुन्हे दाखल**

मागील अभय योजनेत ज्या ग्राहकांनी पाणी कराची रक्कम भरली नाही, अशा ग्राहकांचे नळ कनेक्शन ओसीडब्ल्यूने कापले होते. मात्र, हे कापलेले कनेक्शन ग्राहकांनी अवैधरीत्या जोडले. अशा ग्राहकांची यादी ओसीडब्ल्यूच्या अधिकाऱ्यांनी महापौर आणि आयुक्तांपुढे सादर केली. या ग्राहकांवर तातडीने मनपाचे डेलिगेट आणि ओसीडब्ल्यूच्या झोनल अधिकाऱ्यांनी संयुक्तपणे एफआयआर दाखल करण्याचे आदेश महापौर आणि आयुक्तांनी दिले.

**११ पासून सुरू होणार नळजोडणी कापण्याची मोहीम**

१० ऑगस्ट रोजी ‘अभय योजने’चा अखेरचा दिवस आहे. योजना संपेपर्यंतही थकीत पाणी कर न भरणाऱ्या ग्राहकांचे नळ कनेक्शन कापण्याची मोहीम हाती घेण्याचे आदेश यावेळी आयुक्त अश्विन मुदगल यांनी दिले.

# ‘वंदेमातरम्’मुळे बालमनावर देशभक्तीचे संस्कार : महापौर नंदा जिचकार



**महापौर चषकांतर्गत ‘वंदेमातरम्’च्या प्राथमिक फेरीचा प्रारंभ**

‘वंदेमातरम्’ ही समूहगान स्पर्धा असली तरी अशा स्पर्धेतून विद्यार्थीमनावर देशभक्तीचे संस्कार रुजत असतात, असे प्रतिपादन महापौर नंदा जिचकार यांनी केले. नागपूर महानगरपालिकेच्या शिक्षण विभागातर्फे ‘महापौर चषकां’तर्गत आयोजित ‘वंदेमातरम्’ समूहगान स्पर्धेच्या प्राथमिक फेरीचा शुभारंभ विदर्भ साहित्य संघाच्या सभागृहात महापौर नंदा जिचकार यांच्या हस्ते झाला. यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी मंचावर शिक्षण समिती सभापती प्रा. दिलीप दिवे, क्रीडा सभापती नागेश सहारे, धरमपेठ झोन सभापती रुपा राय, क्रीडा समितीचे उपसभापती प्रमोद तभाने, उपायुक्त रवींद्र देवतळे, शिक्षणाधिकारी संध्या मेडपल्लीवार, परीक्षक सुधीर वारकर, मोहन भोयर, ज्ञानेश्वर खडसे उपस्थित होते. पुढे बोलताना महापौर नंदा जिचकार म्हणाल्या, माजी महापौर कुंदाताई विजयकर यांनी सुरू केलेल्या ह्या स्पर्धेने अल्पावधीतच शिक्षण क्षेत्रात लोकप्रियता मिळविली. प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये स्वत:चे अस्तित्व असते. त्याला संस्काराची जोड दिली तर भविष्यातील देशभक्त नागरिक घडत असतो. डॉ. आंबेडकर, महात्मा गांधी हे संस्कारामुळेच महामानव झालेत. ‘वंदेमातरम्’ ही स्पर्धा संस्कार घडविण्याचा उत्तम मार्ग आहे. अशा स्पर्धेमुळे देशभक्ती, देशप्रेम उत्तरोत्तर वाढत असते.

शिक्षण समिती सभापती प्रा. दिलीप दिवे म्हणाले, ‘वंदेमातरम्’ ही स्पर्धा प्रत्येक विद्यार्थ्यांमध्ये देशाप्रती सन्मान आणि अभिमान जागवते. ह्या स्पर्धेत भविष्यात नागपुरातील प्रत्येक शाळांनी सहभागी व्हावे, असे आवाहन करीत सहभागी संघांना शुभेच्छा दिल्या. प्रास्ताविकात शिक्षणाधिकारी संध्या मेडपल्लीवार यांनी ‘वंदेमातरम्’ स्पर्धेमागील पार्श्वभूमी विषद केली. तत्पूर्वी महापौर नंदा जिचकार आणि अन्य मान्यवरांनी देवी सरस्वती आणि बंकिमचंद्र चॅटर्जी यांच्या प्रतिमेला माल्यार्पण केले. यावेळी स्पर्धेच्या परिक्षकांचा शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यानंतर स्पर्धेला सुरुवात झाली. ९ ते १४ ऑगस्ट दरम्यान चालणाऱ्या या स्पर्धेतील प्राथमिक फेरीतून दररोज तीन संघांची निवड करण्यात येईल. अंतिम फेरी १४ ऑगस्ट रोजी असून प्राथमिक फेरीतील विजेत्या संघांमधून अंतिम तीन संघांची निवड करण्यात येईल. कार्यक्रमाचे संचालन मनपाचे क्रीडा निरीक्षक नरेश चौधरी यांनी केले. कार्यक्रमाला विविध शाळांचे विद्यार्थी आणि शिक्षक उपस्थित होते.

# आता कचरा संकलन वाहनांवर वाजणार 'जनजागृती गीत'



महापौरांची संकल्पना सत्यात उतरली : 'स्वच्छता जनजागृती गीत' प्रसारणाचा शुभारंभ

स्वच्छ भारत अभियानांतर्गत ५ जून पासून ओला आणि सुका कचरा निर्मिती स्थळापासूनच वर्गीकृत करण्याची मोहिम मनपाद्वारे सुरू करण्यात आली. या मोहिमेची जनजागृती व्यापक प्रमाणात व्हावी यासाठी महापौर नंदा जिचकार यांनी घरोघरी कचरा संकलनासाठी जाणाऱ्या गाड्यांवर जनजागृती गीत वाजविण्याची संकल्पना मांडली. ही संकल्पना आता प्रत्यक्षात उतरली असून आता कचरा संकलन गाड्यांवरूच गीतांच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येणार आहे. या अभिनव जनजागृती मोहिमेचा शुभारंभ १५ ऑगस्ट रोजी महापौर नंदा जिचकार यांच्या हस्ते करण्यात आला.

याप्रसंगी उपमहापौर दीपराज पार्डीकर, स्थायी समिती सभापती संदीप जाधव, सत्तापक्ष नेते संदीप जोशी, विरोधी पक्ष नेते तानाजी वनवे, आयुक्त अश्विन मुदगल, स्थापत्य समिती सभापती संजय बंगाले, धरमपेठ झोन सभापती रूपा राय, अतिरिक्त आयुक्त आर.झेड.सिद्दीकी, अतिरिक्त आयुक्त रवींद्र कुंभारे, उपायुक्त रवींद्र देवतळे, उपायुक्त डॉ. रंजना लाडे, अतिरिक्त उपायुक्त जयंत दांडेगावकर, आरोग्य अधिकारी डॉ.प्रदीप दासरवार प्रामुख्याने उपस्थित होते.

स्वच्छ भारत मिशन अंतर्गत जनजागृतीचे गीत अभियानाच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे. स्वच्छेतेविषयी तसेच ओला आणि सुका कचरा वर्गीकरणाच्या हेतूविषयी जनजागृती या गीताच्या माध्यमातून करण्यात येत आहे. हेच गीत आता नागपुरात घरोघरी जाऊन कचरा संकलन करणाऱ्या गाड्यांवर वाजणार आहे. कचरा संकलन आणि त्याच वाहनावरून गीतांच्या माध्यमातून जनजागृती असा दुहेरी उद्देश साध्य करण्यात येत आहे.

दिनांक १६ ऑगस्टपासून नागपूर शहरातील सर्व मोठ्या कचरा संकलन गाड्यांवर हे गीत प्रसारीत होणार आहे. या गीतांमुळे स्वच्छ भारत अभियानाचा संदेश परिणामकारकरीत्या नागरिकांपर्यंत पोहचेल असा विश्वास महापौर नंदा जिचकार यांनी यावेळी व्यक्त केला.

**महापौरांच्या संकल्पनेचे कौतुक**

महापौर नंदा जिचकार ह्या स्वच्छता अभियानाच्या बाबतीत कमालीच्या गंभीर आहेत. या अभियानावर त्या स्वत: लक्ष ठेवून आहे. हे अभियान यशस्वी करायचे असेल तर नागरिकांची मानसिकता बदलविणे गरजेचे आहे. हे सर्वात मोठे आव्हान असून जनजागृती हा त्यावरील उपाय आहे. हेच लक्षात घेऊन त्यांनी जनजागृतीची ही अभिनव संकल्पना पदाधिकारी आणि अधिकाऱ्यांसमोर मांडली. या संकल्पनेचे साऱ्यांनीच कौतुक केले आणि १५ ऑगस्ट रोजी या उपक्रमाचा शुभारंभही करण्यात आला.

# नदीचे प्रवाह अडवून बांध तयार करा : दीपराज पार्डीकर



**आयुक्तांसह केली कन्हान जलशुद्धीकरण केंद्राची पाहणी**

कन्हान नदीचा प्रवाह अडवून बांध तयार करा म्हणजे पाण्याचा संचय होईल, असे निर्देश कार्यकारी महापौर दीपराज पार्डीकर यांनी दिले. गुरूवारी (ता.२४) मनपा आयुक्त अश्विन मुदगल यांच्यासह कन्हान येथील जलशुद्धीकरण केंद्राची त्यांनी पाहणी केली.

याप्रसंगी त्यांच्यासमवेत परिवहन समिती सभापती जितेंद्र (बंटी) कुकडे, स्थापत्य व प्रकल्प समिती सभापती संजय बंगाले, जलप्रदाय समिती सभापती राजेश घोडपागे, हनुमाननगर झोन सभापती भगवान मेंढे, नगरसेवक पिंटु झलके, मनोज सांगोळे, कार्यकारी अभियंता संजय गायकवाड उपस्थित होते.

यावेळी कार्यकारी महापौर दीपराज पार्डीकर व आयुक्त अश्विन मुदगल यांनी जलशुद्धीकरण केंद्राची पाहणी करत तेथील कामकाजाचा आढावा घेतला. नदीच्या प्रवाहात बांध तयार करण्यात यावे. जेणेकरून पाण्याचा संचय होईल व भविष्यातील पाणी टंचाई थांबविण्यासाठी त्याचा उपयोग होईल. नदीच्या आसपास असलेल्या दगडाने बांध तयार करा. तात्पुरती सोय होईल, अशी व्यवस्था तयार करा असे निर्देश कार्यकारी महापौरांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

कन्हान जलशुद्धीकरण केंद्रात सद्यस्थितीत २०८ एमएलडी पाण्याचे शुद्धीकरण करणे सुरू असून या जलशुद्धीकरण केंद्राची क्षमता एकूण २४० एमएलडी इतकी आहे. उन्हाळ्यात पाण्याची क्षमता २२० एमएलडी इतकी असते, अशी माहिती कार्यकारी अभियंता संजय गायकवाड यांनी दिली. मनपाच्या दीर्घकालिन योजनेत बांध तयार करण्याबाबत प्रस्ताव तयार करा, असे आदेश दीपराज पार्डीकर यांनी दिले. जलशुद्धीकरण केंद्रात नवीन तंत्रज्ञानाचा वापर करावा व नागरिकांना पाणी शुद्धस्वरूपात मिळेल याची विशेष काळजी घेण्यात यावी, असे निर्देश आयुक्त अश्विन मुदगल यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

# नागरिकांची गैरसोय होंणार नाही याची दखल घ्या - कार्यकारी महापौर दीपराज पार्डीकर. ओसीडब्लुच्या अधिका.यांना दिले निर्देश.



पाईपलाईनचा व्हॉल्व फुटल्याने पाणीपुरवठा खंडीत, नागरिकांची तारांबळ

नागरिकांना कुठलाही प्रकारचा त्रास होणार नाही याची दखल घ्यावी, भविष्यात अशी घटना घडू नये यासाठी प्रशासनाने दक्षता बाळगावी असे आदेश कार्यकारी महापौर दीपराज पार्डीकर यांनी दिले.

कन्हान येथून येणा-या पिण्याच्या पाण्याच्या पाईपलाईनचा व्हॉल्व फुटल्याने उत्तर नागपूर व मध्य नागपूरच्या नागरिकांचा पाणी पुरवठा खंडीत झाला. नागरिकांची ऐन गणेशोत्सवादरम्यान झालेली गैरसोय बघता कार्यकारी महापौर दीपराज पार्डीकर यांनी ऑटोमोटिव्ह चौकात घटनास्थळी भेट दिली. व नाराजी व्यक्त केली. यावेळी त्यांच्यासमवेत नगरसेविका यशश्री नंदनवार, शकुंतला पारवे, नगरसेवक जितेंद्र घोडेस्वार, राजु चांदेकर आदी उपस्थित होते.

ऑटोमोटिव्ह चौकातील पाईपलाईन ही जुनी झाल्याने ती दुरूस्ती करण्याचे काम सुरू होते. परंतु त्या दुरूस्ती दरम्यानच मुख्य पाईपलाईनला धक्का लागल्याने पाईपलाईनचा व्हॉल्व फुटला, त्यामुळे उत्तर नागपूर मधील व मध्य नागपूरचा काही भागात पाणी पुरवठा खंडीत झाला. 16 तास उलटूनही पाणी पुरवठा सुरू न झाल्याने कार्यकारी महापौर दीपराज पार्डीकर यांनी संताप व्यक्त केला व अधिका-यांना खडेबोल सुनावले. ओसीडब्लुचा करार रद्द करावा अशी मागणीही त्यांनी यावेळी बोलताना केली. या सर्वाला प्रशासनाला जवाबदार घोषीत धरले आहे. यापुढे अशी कुठलीच प्रकारची घटना घटनार नाही याची विशेष खबरदारी घ्या, असे आदेश त्यांनी प्रशासनाला दिले.

# गांधीसागर तलाव येथे स्थायी कृत्रिम विसर्जन कुंडाचे लोकार्पण



पर्यावरण संवर्धनाच्या दिशेने मनपाचे पाऊल

स्वच्छ आणि प्रदूषणमुक्त शहर साकारण्यासाठी तसेच पर्यावरणाच्या संरक्षणासाठी मनपातर्फे विविध उपाययोजना करण्यात येत आहे. याअंतर्गत मूर्ती विसर्जनासाठी गांधीसागर तलाव येथे स्थायी कृत्रिम कुंडाची निर्मिती करण्यात आली आहे. त्याचे लोकार्पण आज (ता. ३१ऑगस्ट) गांधीसागर तलाव येथे महापौर नंदा जिचकार यांच्याहस्ते व आमदार विकास कुंभारे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.

यावेळी सत्तापक्षनेते संदीप जोशी, माजी महापौर प्रवीण दटके, ज्येष्ठ नगरसेवक व माजी सत्तापक्ष नेते दयाशंकर तिवारी, धंतोली झोनचे सभापती प्रमोद चिखले, माजी स्थायी समिती अध्यक्ष बंडू राऊत,नगरसेविका उज्ज्वला शर्मा, विजय चुटेले, लता काटगाये, हर्षला साबळे, धंतोली झोनचे सहायक आयुक्त गणेश राठोड, नद्या व सरोवरे विभाग उपअभियंता मो. इजराईल उपस्थित होते.

दरवर्षी मूर्तीविसर्जनासाठी सर्वाधिक भाविक गांधीसागर तलाव येथे येत असल्याने येथे स्थायी स्वरुपात टँकची निर्मिती करण्यात आली आहे. पुजेचे साहित्य आणि निर्माल्य गोळा करण्यासाठी देखिल याठिकाणी निर्माल्य कलश ठेवण्यात आले आहे. यासोबतच कृत्रिम तलाव देखिल गांधीसागर तलावाच्या शेजारी उभारण्यात आले आहे. भाविकांनी स्वच्छ, सुंदर आणि प्रदूषणमुक्त शहर साकारण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन महापौरांनी केले.

# महिला व बालकल्याण समितीतर्फे विदर्भस्तरीय महिला उद्योजिका मेळावा



नागपुरातील महिलांसोबतच विदर्भातील महिलांना हक्काचे व्यासपीठ मिळावे या उद्देशाने नागपूर महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समितीच्या वतीने विदर्भस्तरीय महिला उद्योजिका मेळाव्याचे आयोजन जानेवारी २०१८ मध्ये करण्यात येणार आहे. यासाठी महिला व बालकल्याण समितीतर्फे आयोजनाच्या सहकार्यासाठी आणि निधी उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने शासनाला पत्र देण्यात येणार असल्याचा निर्णय महिला व बालकल्याण समितीच्या बैठकीत आज (ता. ३१ ऑगस्ट) रोजी झालेल्या बैठकीत घेण्यात आला.

अध्यक्षस्थानी महिला व बालकल्याण समिती सभापती वर्षा ठाकरे होत्या. यावेळी प्रामुख्याने उपसभापती श्रद्धा पाठक, तारा (लक्ष्मी) यादव, दिव्या धुरडे, परिणिता फुके, वंदना भगत, साक्षी राऊत, वैशाली नारनवरे यांच्यासह समाजकल्याण विभागातील अधिका-यांची उपस्थिती होती.

शहराच्या हृदयस्थळी महिला उद्योजिका मेळाव्याचे आयोजन करण्याचा समितीचा मानस असून यासाठी आवश्यक बाबींची पूर्तता करण्यात येत असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. मेळाव्यात महिलांसाठी तज्ज्ञांचे मार्गदर्शन, विविध स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम आदींचे आयोजन करण्यात येणार आहे. नियोजनबद्ध पद्धतीने आयोजन व्हावे यासाठी आवश्यक पूर्व तयारीबद्दलचा आढावा बैठकीत घेण्यात आला.